**<u>ठळक बातम्या</u>**

- इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या उत्पादनाला प्रोत्साहन देणारी नवी योजना केंद्र सरकारकडून जाहीर, केंद्र सरकारी कर्मचारी आणि निवृत्तीवेतनधारकांना २ टक्के अतिरिक्त महागाई भत्ता देण्याचा मंत्रीमंडळाचा निर्णय

- भारत आणि जपान यांच्यात १ लाख ८ हजार कोटी रुपयांचे कर्जाचे करार

- थायलंड आणि म्यानमारमध्ये झालेल्या भूकंपात ३ जण ठार, ९० जण जखमी

**आणि**

- आयपीएलमध्ये चेन्नई सुपर किंग्ज आणि रॉयल चॅलेंजर बेंगळुरू यांच्यात सामना सुरू

**<><><><><>**

इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या उत्पादनाला प्रोत्साहन देण्यासाठी इलेक्ट्रॉनिक्स कॉँपोनंट उत्पादन योजनेला आज केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज नवी दिल्ली इथं मंत्रिमंडळ बैठकीनंतर पत्रकारपरिषदेत ही माहिती दिली. या योजनेकरता २२ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून त्यामुळे ९१ हजारपेक्षा जास्त रोजगारनिर्मिती होणार आहे.

चालू खरीप हंगामासाठी स्फुरद आणि पोटॅश खतांवर अनुदानाच्या दरांनाही मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी मिळाली. त्यानुसार DAP चं ५० किलो वजनाचं पोतं शेतकऱ्यांना तेराशेपन्नास रुपयांना मिळेल.

केंद्रसरकारी कर्मचारी आणि निवृत्तीवेतनधारकांना २ टक्के अतिरिक्त महागाई भत्ता देण्याचा निर्णयही आजच्या बैठकीत झाला. त्यानुसार आता महागाई भत्ता ५३

टक्क्यावरुन ५५ टक्के होणार आहे. १ जानेवारी- २०२५ पासून ही वाढ लागू होणार आहे. याचा फायदा ४८ लाख ६६ हजार कर्मचारी आणि ६६ लाख ५५ हजार निवृत्तीवेतनधारकांना होणार आहे.

<><><><><>

देशी हरभऱ्याच्या  आयातीवर १ एप्रिलपासून १० टक्के आयात शुल्क लावायचा निर्णय सरकारनं घेतला आहे. अर्थमंत्रालयानं २७ मार्च रोजी याबद्दलची अधिसूचना जारी केली आहे. हरभऱ्याची देशातली उपलब्धता वाढवण्यासाठी आणि किंमतींवर नियंत्रण ठेवण्यासाठी गेल्या वर्षी मे महिन्यात सरकारनं हरभऱ्याच्या निःशुल्क आयातीला परवानगी दिली होती.

<><><><><>

साखरेच्या मासिक साठ्याची मर्यादा निश्चित असून या मर्यादेबाहेर साखरेचा साठा करणाऱ्या साखर कारखान्यांविरुद्ध सरकार कठोर कारवाई करेल, असा इशारा अन्न आणि ग्राहक व्यवहार मंत्रालयानं दिला आहे. साखरेची साठेबाजी रोखण्यासाठी आणि दरवाढ नियंत्रित करण्यासाठी एप्रिल महिन्याची साठ्याची मर्यादा २३ लाख ५० हजार टन इतकी निश्चित केली आहे. दर महिन्यासाठी मर्यादा घालून दिलेली असतानाही काही सहकारी आणि खासगी साखर कारखान्यांनी या मर्यादेचं उल्लंघन केल्याचं आढळलं आहे. त्यामुळे नवीन मार्गदर्शक तत्वं जारी केली असून त्यात पहिल्यांदा उल्लंघन केलं तर अतिरिक्त साखरेच्या १०० टक्के भरपाई पुढच्या महिन्याच्या कोट्यातून वजा केली जाईल. त्यानंतर होणाऱ्या उल्लंघनांसाठी ही टक्केवारी वाढवली जाणार आहे.

<><><><><>

गेल्या ३ वर्षात मराठवाड्यातल्या ३ हजार ९० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असल्याची माहिती केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंग चौहान यांनी राज्यसभेत लेखी उत्तरात दिली. २०२२ मध्ये १ हजार २२, २०२३ मध्ये १ हजार ११६

आणि २०२४ मध्ये ९५२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची माहिती छत्रपती संभाजीनगरच्या विभागीय आयुक्तांनी कळवल्याचं यात म्हटलं आहे.

<><><><>

लोकसभेने आज समुद्रमार्गे मालवाहतूक विधेयक २०२५ मंजूर केलं. हे विधेयक १९२५ साली केलेल्या समुद्रमार्गे मालवाहतूक कायद्याची जागा घेणार असून त्यात मालवाहू जहाज कंपन्यांचे हक्क आणि जबाबदाऱ्या नोंदवलेल्या आहेत. या कायद्यातल्या बिल ऑफ लेडिंग सहित इतर अनेक नियमांची अंमलबजावणी करण्याचे अधिकार केंद्र सरकारच्या अखत्यारीत दिले आहेत. जुन्या कायद्यामध्ये कालानुरूप बदल घडवण्याचे काम या नव्या कायद्यामुळे होत आहे, असं केंद्रीय बंदरे,नौवहन आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी सांगितलं.

<><><><>

राज्यसभेत विमान संबंधित वस्तू हितरक्षण विधेयक २०२५ वर आज चर्चा झाली. काँग्रेसचे खासदार नीरज डांगी यांनी ‘उडान’ योजनेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं. विमानतळांचं खाजगीकरण आणि वाढलेल्या विमान प्रवास भाड्याचा मुद्दा तसंच विमान रुग्णवाहिकांची सेवा देशभरात उपलब्ध होण्याची गरज त्यांनी मांडली. भारतातली अंतर्देशीय विमानसेवा बाजारपेठ जगभरातली तिसऱ्या क्रमांकाची मोठी बाजारपेठ असल्याचं राष्ट्रवादी चे खासदार प्रफुल पटेल यांनी सांगितलं. देशात २०१४ साली फक्त ७४ विमानतळ होते, त्यांची संख्या वाढून आता १४९ झाली आहे, तर विमानप्रवाशांची संख्याही वाढून १६ कोटींवर पोचली असल्याचं भाजपचे खासदार धनंजय महाडिक यांनी सांगितलं. द्रमुक, आम आदमी पक्ष, तेलगू देसम पक्षाच्या खासदारांनीही चर्चेत भाग घेतला.

<><><><>

जपानच्या, विकास सहायता कार्यक्रमांतर्गत सहा महत्वाच्या प्रकल्पांसाठी भारत आणि जपान यांच्यात १ लाख ८ हजार कोटी रुपयांचे कर्जाचे करार झाले

आहेत. नवी दिल्लीत काल भारत आणि जिका अर्थात जपान इंटरनॅशनल को ऑपरेटिव्ह एजन्सी यांनी या करारांवर सह्या केल्याचं अर्थमंत्रालयानं प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. वन व्यवस्थापन, पाणी पुरवठा, नागरी वाहतूक, ॲक्वाकल्चर, जैवविविधता संवर्धन, गुंतवणूक प्रोत्साहन, अशा विविध क्षेत्रांमधल्या उपक्रमांना या करारामुळे बळ मिळणार आहे.

**<><><><><>**

खाद्य पदार्थ आणि शीत पेयांच्या देयकांवर आकारला जाणारा सेवा शुल्क ऐच्छिक स्वरूपाचा असल्याच्या दिल्ली उच्च न्यायालयाच्या निर्णयाचं केंद्रीय खाद्यपदार्थ आणि ग्राहक व्यवहार मंत्री प्रल्हाद जोशी यांनी स्वागत केलं आहे. सेवा शुल्क आकारण्याची सक्ती उपहार गृहांनी करणं उचित नसल्याची ग्राहक हक्क संरक्षण प्राधिकरणांनं केलेली शिफारस ग्राह्य धरत उच्च न्यायालयानं याबाबतचा निर्णय दिला असल्याचं जोशी यांनी या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

एटीएममधून दर महिन्याला ठराविक वेळा पैसे काढल्यानंतर आणखी पैसे काढण्यासाठी आकारल्या जाणाऱ्या रकमेत १ मेपासून दोन रुपयांनी वाढ करायची परवानगी भारतीय रिझर्व्ह बँकेनं इतर बँकांना दिली आहे. सध्या ही रक्कम प्रति व्यवहार २१ रुपये अशी आहे. बँका आता ती वाढवून २३ रुपयांपर्यंत नेऊ शकतात, असं रिझर्व्ह बँकेनं आपल्या परिपत्रकात म्हटलं आहे. सध्या ग्राहकांना त्यांच्या बँकांच्या एटीएममधून दर महिन्याला पाच वेळा निःशुल्क व्यवहार करता येतात. तसंच इतर बँकांच्या एटीएममधून महानगरांमध्ये तीनदा, तर इतर शहरांमध्ये पाच वेळा कोणतंही शुल्क न देता पैसे काढता येतात.

**<><><><><>**

दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या घरी बेहिशोबी रोख सापडल्याप्रकरणी त्यांच्याविरुद्ध एफआयआर दाखल करायची

मागणी करणारी जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयानं आज फेटाळून लावली. या प्रकरणी अंतर्गत चौकशी सुरू असून ती पूर्ण झाल्यावर सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना उपलब्ध पर्यायांमधून निवड करतील. त्यानुसार ते FIR दाखल करणं किंवा संसदेला पुढील कारवाईसाठी शिफारस करु शकतील, असं न्यायमूर्ती अभय ओक आणि न्यायमूर्ती उज्जल भुयान यांच्या पीठानं स्पष्ट केलं.

**<><><><><>**

थायलंड आणि म्यानमारमध्ये आज झालेल्या भूकंपामुळे बँकॉकमध्ये बांधकाम सुरू असलेली एक इमारत कोसळून किमान तीन जण मृत्यूमुखी पडले, तर सात जणांना वाचवण्यात यश आलं आहे. अद्याप ९० जण बेपत्ता आहेत. ७ पूर्णांक ७ रिख्टर स्केलच्या या भूकंपाचं केंद्र म्यानमारमधल्या मंडालेजवळ होतं. या दुर्घटनेनंतर म्यानमार सरकारनं सहा प्रांतांमध्ये आणीबाणी लागू केली आहे. या भूकंपामुळं मंडाले इथल्या ऐतिहासिक ठिकाणांचं मोठं नुकसान झालं आहे. या भूकंपाचे हादरे चीनच्या युनान आणि सिचुआन प्रांतातही जाणवले आणि यात काहीजण जखमी झाले आहेत, तसंच मालमत्तेचंही नुकसान झालं आहे.

थायलंड आणि म्यानमारला आज ७ पूर्णांक ७ आणि ६ पूर्णांक ४ रिख्टर स्केलच्या भूकंपाचे दोन मोठे धक्के बसले. म्यानमारच्या सागाइंग इथं केंद्र असलेल्या या भूकंपाचे धक्के ९०० किलोमीटर दूर, थायलंडची राजधानी बँकॉकमध्येही जाणवले. बँकॉकमध्ये बांधकाम सुरू असलेली एक मोठी इमारत कोसळली. यात किमान तीन जण ठार झाले आहेत. या पार्श्वभूमीवर म्यानमारमध्ये आणीबाणी घोषित करण्यात आली आहे. या भूकंपामुळं झालेल्या नुकसानाचा आढावा घेण्यासाठी थायलंडच्या प्रधानमंत्र्यांनी तातडीची बैठक बोलावली आहे. या भूकंपाचे सौम्य धक्के कोलकाता आणि इम्फाळमध्येही जाणवले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी थायलंड आणि म्यानमारबद्दल काळजी व्यक्त केली आहे. समाजमाध्यमावरच्या पोस्टद्वारे मोदी यांनी इथल्या नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी

प्रार्थना केली आहे. या दोन्ही देशांना शक्य ती सगळी मदत करायला भारत तयार असल्याचं सांगून त्यांनी परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाला म्यानमार आणि थायलंड सरकारशी संपर्क साधण्याच्या सूचना दिल्या आहेत. थायलंडमधला भारताचा दूतावास परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे. अद्याप कोणत्याही भारतीय नागरिकाला या दुर्घटनेत इजा झाल्याची माहिती नाही. थायलंडमधल्या भारतीय नागरिकांसाठी भारतीय दूतावासाने इमर्जन्सी क्रमांक जाहीर केला आहे. दरम्यान, बांगलादेशच्या विविध भागातही आज ७ पूर्णांक ३ रिख्टरच्या भूकंपाचे हादरे बसले. जीवितहानी झाल्याचं वृत्त अद्याप आलेलं नाही.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत, आज चेन्नईतल्या एम ए चिंदबरम स्टेडिअमवर चेन्नई सुपर किंग्ज आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु यांच्यात सामना सुरु आहे. चेन्नई सुपर किंग्जनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे. शेवटची बातमी हाती आली तेव्हा रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुच्या ८ षटकात २ बाद ७७ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

२०२४ या वर्षाचा सरस्वती सन्मान पुरस्कार प्रसिद्ध संस्कृत विद्वान महामहोपाध्याय साधु भद्रेशदास यांना जाहीर झाला आहे.

//<><><><><>//